बिनतारी संदेश

प्रति - सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व प्रभारी अधिकारी पोस्टे

हस्ते - प्रभारी अधिकारी स्थागुशा/जिविशा/पोलीस मुख्यालय/वाचक शाखा/कोतवाली/कॅम्प/शवाशा/जिवाशा/तोफखाना/ सायबर सेल/नियंत्रण कक्ष/बीडीडीएस नगर/दहशतवाद विरोधी पथक अहमदनगर.

प्रेषक - पोलीस अधीक्षक, अहमदनगर.

---

क्र.आशा १०७/४.२/पोलीस भरती -२०१८/ 945 /२०१८ अहमदनगर दिनांक:२६/०१/२०१८

---

मजकुर :-

सन २०१७ च्या पोलीस शिपाई पदाच्या भरतीसाठी घटकप्रमुखांनी जाहिरात दिली होती . खेळाडु उमदवारांबाबत असलेल्या शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१/०७/२०१६ अन्वये शास निर्णयातील तरतुदींबाबत जाहिरातीमध्ये स्पष्ट केले होते. तसेच उमेदवारांनी आवेदन अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीच्या आधारे व कागदपत्र पडताळणीच्या अधीन राहून उमेदवारांना भरती प्रक्रीयेमध्ये सामावून घेतले होते. परंतु कागदपत्र पडताळणीच्या वेळी, तात्पुरत्या निवडसुची वरील खेळाडू उमेदवारांनी, संदर्भाधीन दिनांक ०१/०७/२०१६ च्या शासन निर्णयातील निमय क्र.४ (पाच) व ६ (आठ) (नऊ) मधील तरतुदीनुसार त्यांच्या खेळाचे प्रमाणपत्र संबंधीत विभागीय उपसंचालक यांच्याकडून प्रमाणित केल्याबाबतचा अंतिम दिनांकापूर्वी प्राप्त करुन घेतलेला नव्हता. त्यामुळे संबंधीत भरती समितीने अशा उमेदवारांना अपात्र ठरविले. संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदींनुसार घटक प्रमुखांनी केलेली कार्यवाही बरोबर असली तरी संबंधीत उमेदवारांनी माननीय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्या समोर याचिका दाखल केलेल्या आहेत.

दिनांक ०१/०७/२०१६ च्या शासन निर्णयाच्या तरतुदींबाबत माहिती नसल्याचे काही उमेदवारांनी त्यांच्या याचिकेमध्ये नमुद केलेले आहे. त्यामुळे आगामी पोलीस शिपाई भरती २०१८ मध्ये अशी परिस्थिती उद्‌भवू नये व खेळाडू उमेदवारांना वरील तरतुदीची माहिती असावी. त्याकरीता प्रेस नोटचा मसुदा सोबत जोडला आहे. तरी, खेळाडू उमेदवारांना आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या तरतुदींची माहिती व्हावी म्हणून प्रभारी अधिकारी यांनी सदरची नमुना प्रेस नोट आपल्या नोटीस बोर्डवर लावण्यात यावी. तसेच प्रभारी अधिकारी सायबर सेल यांनी या कार्यालयाचे संगणक संकेत स्थळ http://ahmednagarpolice.org/wp/ वर प्रसिध्द करण्यात यावी.

(रंजन कुमार शर्मा)
पोलीस अधीक्षक, अहमदनगर.

जावक- 35/18
24/1/2018
18/10
PSO
Pathan SN
PSI

दिनांक : /०१/२०१८

**प्रेस नोट**

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण देण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१/०७/२०१६ अन्वये सर्व समावेशक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

वरील शासन निर्णयातील नियम ४ (पाच) नुसार खेळाडू उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वीच सुधारीत तरतुदींनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवारांने अर्जासोबत विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. वरील प्रमाणे पडताळणी केलेल्या क्रीडा प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडली नसल्यास, सदरहू शासन निर्णयातील नियम ६ (आठ) (नऊ) नुसार सदरहू उमेदवाराचा खेळाडू संवर्गातून विचार करता येत नाही.

सन २०१८ ची पोलीस शिपाई भरती प्रक्रियेसाठी जाहिरात दिनांक ०५/०२/२०१८ रोजी प्रसिध्द होण्याची शक्यता आहे. तरी खेळाडू उमेदवारांची त्यांच्या खेळाच्या प्रमाणपत्रांची संबंधीत विभागीय उपसंचालक यांच्याकडून पडताळणी करुन त्याबाबतचा अहवाल दिनांक ०५/०२/२०१८ पूर्वी प्राप्त करुन घ्यावा.

खेळाडू उमदेवारांनी त्यांच्या खेळाच्या प्रमाणपत्रांची संबंधीत विभागीय उपसंचालक यांच्याकडून पडताळणी केल्या बाबतचा विहित कालावधीतील प्रमाणपत्र आवेदन अर्जासोबत नसल्यास अर्जदाराचा खेळाडू संवर्गातून विचार करण्यात येणार नाही.

**(रंजन कुमार शर्मा)**
पोलीस अधीक्षक, अहमदनगर.